# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ६८४ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ३० /१२/२०१८

## "३१ डिसेंबर २०१८ व १ जानेवारी २०१९ रोजी चोख बंदोबस्त राखणेकरीता पोलीस प्रशासन सज्ज"

भंडारा :- दिनांक ३१/१२/२०१८ रोजी सरत्यावर्षाला निरोप व २०१९ नविन वर्षाचे स्वागत करणे करीता भंडारा जिल्हा पोलीस दल सज्ज झाले असुन भंडारा पोलीस दलातील सर्व अधिकारी कर्मचारी चोख बंदोबस्त करणार आहेत.

भंडारा शहरासह जिल्हयातील चारही उपविभागात योग्य बंदोबस्त लावण्या येणार असुन संबंधीत उप विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी बंदोबस्त प्रमुख म्हणुन राहणार आहेत. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू व अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर बंदोबस्त अधिकारी व कर्मचारी यांना योग्य सुचना देवुन व मार्गदर्शन करून बंदोबस्त यशश्वी होणे करीता लक्ष देणार आहेत.

दिनांक ३० डिसेंबर २०१८ रोजी पासुन जिल्हयात अवैध दारूविक्री, बनावट दारू विक्री व ईतर अवैध व्यवसाया विरूध्द विशेष माहिम राबवुन कारवाया करणार आहेत.

१) जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग व प्रमुख राज्य महामार्गावर, मुख्य चौकात, शहरात प्रवेश करणाऱ्या मार्गावर दिनांक ३१ डिसेंबर २०१८ चे रात्री ८.३० वा. पासुन ते दिनांक १ जानेवारी २०१९ चे सकाळी ५.०० वा. पर्यत ताकाबंदी करण्यात येणार असुन नाकाबंदी दरम्यान शहरात येणारे व जाणारे अशा सर्व वाहनांची बारकाईने व कसुन तपासणी करण्यात येणार आहे.

२) दारू व अन्य मादक पदार्थाचे सेवन करून वाहन चानविणाऱ्या वाहन चालकांवर कडक कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे अल्पवयीन मुले/मुली वाहन चालवितांना मिळुण आल्या त्यांचे पालकांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी पालकांनी आपले अल्वयीन मुलांना वाहने चालविण्याकरीता देण्यात येवु नये बाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनीप्रदुषनाबाबत निर्गमीत केलेल्या निर्देशाचे पालन करण्याचे जनतेला आवाहन करण्यात येत असुन मर्यादेपेक्षा अधिक आवाजात तसेच कर्ण कर्कष आवाजात, डि.जे. लॉऊडस्पिकर वाजविणाऱ्यांवर कार्यवाही केली जाणार आहे.

४) निष्काळजीपणे व भरधाव वेगात वाहन चालविणाऱ्या ईसमांवर कार्यवाही करण्यात येणार असुन नागरीकांनी वाहने चालवितांना वेग मर्यादेचे पालन करण्यास आवाहन पोलीस विभागा तर्फे करण्यात येत आहे.

५) सर्व ठाणेदार त्यांचे कार्यक्षेत्रात योग्य बंदोबस्त लावुन सतत पेट्रोलींग कोठलाही अनुचीप्रकार घडणार नाही याकडे लक्ष देणार आहेत.

६) भंडारा शहरात नागपुर नाका, खात रोड, वरठी रोड, पोस्ट आफिस चौक, राजिव गांधी चौक, महात्मा गांधी चौक ईत्यादी ठिकाणी वाहतुक नियंत्रण शाखा व पोलीस ठाणे भंडाराचे वतीने नाकाबंदी व मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

७) तुमसर, मोहाडी, लाखनी, साकोली, लाखांदुर व पवनी येथे मुख्य चौकात व रहदारीचे ठिकाणी जास्त जास्त अधिकारी कर्मचारी यांची नेमणुक करून बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

८) भंडारा उपविभागत श्री. संजय जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा, तुमसर उप विभागात श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर, पवनी उपविभागात श्री. प्रभाकर तिक्कस, उप विभागीय पोलीस अधिकारी, पवनी हे नियंत्रण करणार आहेत.

९) महिला व मुलींना रात्री दरम्यान असामाजीक घटकांकडुन त्रास होवु नये म्हणुन विशेष पेट्रालींक पथकांची स्थापणा करण्यात आली असुन याकडे मा. पोलीस अधिक्षक व अपर पोलीस अधिक्षक विशेष लक्ष देणार आहेत.

१०) दिनांक १ जानेवारी २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर श्रीमती विनीता साहू, पोलीस अधिक्षक, रश्मि नांदेडकर, अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा व सामाजिक संघंटणांतर्फे "नववर्षाचे स्वागत करू दुग्ध पाणाने, ना की मध्येप्राशनाने" हा उपक्रम राबविण्यात येणार असुन नागरीकांना सुगंधीत मसाला दुधाचे वाटप करण्यात येणार असुन नागरीकांनी दारूच्या प्याले एवजी दुध पिवुन नविन वर्षाचे सुरवात करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.